महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२३ दिनांक ०४ / ०३ / २०२१

**विषय :** मंजूर पदसंख्या ३३ पेक्षा कमी असलेल्या पदांवर दिव्यांग अधिनियमातील तरतुदींनुसार शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ३ टक्के आरक्षण विहित करणेबाबत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०११/प्र.क्र.१२९/सुधार-३ दि. ०४.०८.२०११ अन्वये मंजूर पदसंख्या ३३ पेक्षा कमी असल्यास अशा पदांवर ३% आरक्षण लागू करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी सदर शासन परिपत्रकाव्दारे प्रसारीत केलेल्या सूचना कंपनीअंतर्गत अंगिकृत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०११/प्र.क्र.१२९/सुधार-३ दि. ०४.०८.२०११ ची प्रत सोबत जोडली असून, शासनाने प्रसारीत केलेल्या सूचनांचे अवलोकन करावे व त्याबाबतची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** दि. ०४.०८.२०११ रोजीचे शासन परिपत्रक.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तीना शासकीय / निमशासकीय सेवेत <u>आरक्षण देऊन पदे भरणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. १२९/ सुधार -३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ४ **ऑगस्ट, २०११.**

**वाचा:-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/ ९९/१६-अ, दि.४ मार्च,२००२

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३ / (भाग-३)/१६-अ, दि. १९ ऑक्टोबर ,२००७

४) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -०६/ प्र.क्र. ९ / सुधार -३, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.

५) शासन निर्णय क्रमांक :- अपंग- २०१०/ प्र.क्र. १९४ / सुधार -३ दिनांक :- १७ मार्च, २०११.

६) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक :- २७ एप्रिल, २०११.

**<u>परिपत्रक :-</u>**

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. वरील संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथील शासन परिपत्रकाव्दारे सामान्य प्रशासन विभागाने शासन सेवेतील गट "अ " ते गट " ड " मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती विहित केलेली आहे. वरील अनुक्रमांक ४,५ व ६ अन्वये अपंग व्यक्तींसाठी लागू करण्यात आलेले ३% आरक्षण पदभरती करताना संवर्ग संख्येला लावण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच अपंग व्यक्तींसाठी वरील शासन निर्णय दि.१७ मार्च ,२०११ अन्वये पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. पदे सुनिश्चित करण्यात आलेल्या एखादया संवर्गामध्ये पदसंख्या ३३ पेक्षा कमी असेल अशा वेळी ३% प्रमाणे अपंगांसाठी पद राखून ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

आता अपंग व्यक्तींसाठी सुनिश्चित केलेल्या संवर्गनिहाय मंजूर पदांमध्ये ३ % पदांवर अपंगांसाठी आरक्षण ठेवताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत:-

| संवर्गातील मंजूर पदसंख्या | अपंगांकरिता राखीव पदे |
|---|---|
| १-७ | निरंक |
| ८-३३ | १ पद |
| ३३ पेक्षा जास्त | ३ टक्के आरक्षणानुसार पूर्ण एककात येणारी पदे आणि त्यापुढील अपूर्णांक ०.५ अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर त्याकरीता १ अतिरिक्त पद गृहीत धरावे. |

३. सदर परिपत्रकातील सूचना संबंधित मंत्रालयीन विभागाने आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, अनुदान प्राप्त संस्था यांच्या निदर्शनास आणाव्यात.

४. हे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११७/१६-अ, दि. २७/७/२०११ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन परिपत्रक शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. **२०११०८०३१२४९४९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दिनेश वाघमारे )**
**सचिव,महाराष्ट्र शासन.**

प्रति :-

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई (पत्राने )
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, समाजकल्याण अधिकारी,गट अ जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती-सुधार-३.